बृहन्मुंबई महानगरपालिका

नायर रुग्णालय दंत महाविद्यालय, मुंबई

डिसी/2857/आस्था दि.२६.०६.२०२५

मा. अधिष्ठाता

नायर रुग्णालय दंत महाविद्यालय

विषय – नायर रुग्णालय दंत महाविद्यालयाच्या आस्थापनेवरील विविध संवर्गाची रिक्त पदे कंत्राटी तत्वावर भरण्याबाबत.

उपरोक्त विषयान्वये नायर रुग्णालय दंत महाविद्यालयाच्या आस्थापनेवरील विविध संवर्गाची रिक्त पदे कंत्राटी तत्वावर भरण्याकरिता मा. महानगरपालिका आयुक्त यांच्या क्र. एमजीसी/एफ/६२२३ दि. १७.०४.२०२५ च्या मंजुरीच्या अनुषंगाने दि.०५.०५.२०२५ ते दि. ०९.०५.२०२५ पर्यंत जाहिरात प्रसारित करुन अर्ज मागविले होते. परंतु, सदर जाहिरातीनुसार काही संवर्गातील पदांचे अर्ज प्राप्त झाले नाहीत, काही संवर्गाचे कमी प्रमाणात अर्ज प्राप्त व काही संवर्गाचे प्राप्त झालेले अर्ज अपात्र ठरल्यामुळे दि. १५.०५.२०२५ ते दि. २३.०५.२०२५ व दि. ११.०६.२०२५ ते दि. २०.०६.२०२५ पर्यंत जाहिरात पुनश्चः प्रसारित करण्याकरिता मा. अधिष्ठाता यांची क्र. डिसी/१५६८/आस्था दि.१५.०५.२०२५ व डिसी/२२७२/आस्था दि. १०.०६.२०२५ अन्वये मंजुरी घेऊन जाहिरात प्रसारित करण्यात आली होती. परंतु खालील तक्त्यात नमूद संवर्गाचे अर्ज अजूनही प्राप्त झाले नाहीत.

यास्तव, खालील तक्त्यात नमूद संवर्गाची रिक्त पदे कंत्राटी तत्वावर भरण्याकरिता दि. २६.०६.२०२५ ते दि. ०४.०७.२०२५ पर्यंत जाहिरात महानगरपालिकेच्या पोर्टलवर प्रसारित करण्याकरिता मा. अधिष्ठाता यांची कृपया मंजुरी मिळावी ही विनंती.

| अ.क्र. | कंत्राटी तत्वावरील पदाचे नाव | कंत्राटी तत्वावर भरावयाची पदे | दरमहा ठोक वेतन रु. |
|---|---|---|---|
| १ | अधिपरिचारिका | १ | रु. ३०,०००/- |
| २ | दंत यांत्रिकी | १ | रु. २०,०००/- |
| ३ | दुरध्वनी चालक | २ | रु. १४,०००/- |

सही /-

प्रशासकीय अधिकारी

नायर रुग्णालय दंत महाविद्यालय

उपरोक्त 'अ' यथा प्रस्तावित मंजुर

सही /-

अधिष्ठाता

नायर रुग्णालय दंत महाविद्यालय

# बृहन्मुंबई महानगरपालिका

नायर रुग्णालय दंत महाविद्यालय, मुंबई सेंट्रल, मुंबई-४०००८

क्र. डीसी/**2857**/आस्था दि.**26.06.2025**

## जाहिरात

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या नायर रुग्णालय दंत महाविदयालयाच्या आस्थापनेवरील खाली नमूद करण्यात आलेली विविध संवर्गातील पदे तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी तत्वावर दि. ०१.०८.२०२५ ते ३१.०३.२०२७ या कालावधीकरिता (प्रत्येक ९० दिवसांपूर्वी खंड देऊन) ठोक वेतनावर भरावयाची आहेत. त्यासाठी निवड यादी बनविण्याकरिता सदर पदांच्या नमूद केलेल्या अर्हता व अटींची पूर्तता करणा-या इच्छूक उमेदवारांकडून अर्ज शुल्क रु. ७९०/-+जीएसटी १४२/- =रु.९३२/- इतके भरुन अर्ज वितरित करण्यात येतील.

सदर अर्जांची विक्री व स्विकृती दि. २६.०६.२०२५ ते दि.०४.०७.२०२५ पर्यंत (कार्यालयीन वेळेत) संध्याकाळी ४.०० वाजेपर्यंत

लेखा विभाग, पहिला मजला

नायर रूग्णालय दंत महाविदयालय (विस्तारित इमारत)

| अ.क्र. | कंत्राटी तत्वावरील पदाचे नाव | कंत्राटी तत्वावर भरावयाची पदे | दरमहा ठोक वेतन रु. |
|---|---|---|---|
| १ | अधिपरिचारिका | १ | रु. ३०,०००/- |
| २ | दंत यांत्रिकी | १ | रु. २०,०००/- |
| ३ | दुरध्वनी चालक | २ | रु. १४,०००/- |

- सही/- -

अधिष्ठाता

**नायर रुग्णालय दंत महाविद्यालय**

**अ) वयोमर्यादा:** उमेदवाराचे वय किमान १८ वर्षे पूर्ण व ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे.

**ब) अर्हता:-**

**दंत यांत्रिकी**

1. उमेदवार मान्यताप्राप्त मंडळाची विज्ञान शाखेची एच.एस.सी. (उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र) किंवा तत्सम परीक्षा भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र (पीसीबी) व इंग्रजी विषय घेऊन उत्तीर्ण असावा.
2. उमेदवाराने भारतीय दंत परिषदेच्या मान्यताप्राप्त संस्थेमधून दंत तंत्रज्ञाची (**Dental Mechanic**) ची पदविका प्राप्त केलेली असावी.
3. उमेदवार भारतीय दंत परिषदेकडे नोंदणीकृत असावा.
4. दंतयांत्रिकी कामाचा कमीत कमी ६ महिन्यांचा अनुभव असलेल्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.
5. उमेदवाराने माध्यमिक शालांत प्रमाणपत्र किंवा तत्सम किंवा उच्चतम परिक्षेत किमान ५० गुणांचा मराठी विषय घेऊन उत्तीर्ण असावा.
6. उमेदवार डी.ओ.ई.ए.सी.सी. सोसायटीचे सी.सी.सी. किंवा ओ स्तर किंवा ए स्तर किंवा बी स्तर किंवा सी स्तर किंवा स्तरावरील प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च आणि तांत्रिकी शिक्षण मंडळाचे एम.एस.आय.टी. किंवा जी.ई.सी.टी. चे प्रमाणपत्र धारक असावा.
7. उमेदवाराने खात्यामार्फत घेण्यात येणारी व्यवसाय चाचणी उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

**दुरध्वनी चालक**

1. उमेदवार मान्यताप्राप्त मंडळाची माध्यामिक व उच्च शालांत प्रमाणपत्र किंवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण असावा.

आणि

2. शासन मान्यता प्राप्त संस्थेमार्फत किमान ६ महिने इतका दूरध्वनीचालक म्हणून अभ्यासक्रम पूर्ण केलेला असावा.
3. उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र वा तत्सम किंवा उच्च परिक्षा १०० गुणांचा मराठी व १०० गुणांचा इंग्रजी विषय घेऊन उत्तीर्ण झालेला असावा.
4. उमेदवाराला मराठी, हिंदी, इंग्रजी भाषा किमान लिहिता वाचता येणे आवश्यक आहे.

**अधिपरिचारिका**

1. उमेदवार मान्यताप्राप्त मंडळाची उच्च माध्यमिक शालांत परीक्षा १२ वी उत्तीर्ण असावा.
2. उमेदवार जनरल नर्सिंग अधिक मिडवायफरी डिप्लोमाधारक असावा. (३ किंवा ३१/२ वर्षाचा कालावधी पूर्ण झालेला अभ्यासक्रम उत्तीर्ण झालेला असावा.
3. उमेदवार महाराष्ट्र नर्सिंग कौंसिलकडून नोंदणीकृत असावा.
4. उमेदवार महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची शालांत परीक्षा वा तत्सम किंवा उच्चतम परिक्षेत किमान ५० गुणांची प्रश्नपत्रिका असलेला मराठी विषय घेऊन उत्तीर्ण असावा.
5. उमेदवाराने संगणकाचे ज्ञान अवगत करणे आवश्यक आहे. त्याने/तिने डी.ओ.ई.ए.सी.सी. सोसायटीचे (सी.सी.सी.) किंवा (ओ स्तर) किंवा (ए स्तर) किंवा (बी स्तर) किंवा (सी स्तर) स्तरावरील प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च आणि तांत्रिकी शिक्षण मंडळाचे एम.एस.आय.टी. किंवा जी.ई.सी.टी. चे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक आहे.

**क) निवडीचे निकष –**

१. पदाच्या सेवा प्रवेश नियमानुसार विहित केलेली अर्हता/अटी/शर्ती धारण करित असलेल्या उमेदवारांमधून शैक्षणिक अर्हता व मुलाखतीच्या आधारे उमेदवारांची निवड यादी तयार करण्यात येईल.

ड) कर्तव्य व जबाबदा-या

ज्या संवर्गातील पदावर तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी तत्वावर नियुक्त केलेल्या उमेदवारांना त्यांच या पदाची कर्तव्ये व जबाबदा-या पार पाडाव्या लागतील.

१) उमेदवार अधिष्ठाता/संबंधित विभागप्रमुख/अधिसेविका/प्रशासकीय कार्यालय/सहाय्यक समयलेखक कार्यालय यांच्या अखत्यारीत आणि मार्गदर्शनाखाली कर्तव्य पाड पाडतील.

२) उमेदवारांना चक्रांकित पध्दतीने तीनही सत्रांमध्ये आवश्यकतेनुसार कर्तवय बजावावे लागेल.

३) उमेदवारांना नियमांनुसार रुग्णालय प्रशासनाने तयार केलेल्या व अधिष्ठाता यानी मंजुर केलेल्या डयुटी लिस्टप्रमाणे साप्ताहिक सुट्टीचा लाभ मिळेल.

४) कंत्राटी कर्मचा-यांना रुग्णालयात कर्तव्य बजावताना संबंधित विभागातील मार्गदर्शक तत्वे व कार्यप्रणालीचे पालन करावे लागेल.

५) उमेदवाराने कंत्राट कालावधीमध्ये रुग्णालयात काम करीत असताना महापालिकेच्या नियमांचे उल लंघन केल्यास, काही आक्षेपाह वर्तन केल्यास, संबंधित विभागातील कामकाजाबाबत अकार्यक्षमता केल्याचे निदर्शनास आल्यास तसेच रुग्णसेवेमध्ये निष्काळजीपणा केल्याचे निदर्शनास आल्यास उमेदवाराला कोणतीही पूर्वसूचना न देता त्याची कंत्राट तत्वावरील नियुक्ती तात्काळ समाप्त करण्यात येईल.

**इ) अटी व शर्तीः -**

१) कंत्राटी तत्वावर करण्यात आलेली नेमणूक ही निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची आहे.

२) कंत्राटी तत्वावर करण्यात आलेली नेमणूक आवश्यक नसल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता रद्द करण्यात येईल.

३) सदर नेमणूक नियमित स्वरुपाची नसल्यामुळे काही अपरिहार्य परिस्थिती उद्भवल्यास निवड यादी रद्द करण्यात येईल.

४) अर्जदाराने अर्ज स्वहस्ताक्षरात भरावा व अपूर्ण अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

५) पासपोर्ट आकाराचा फोटो अर्जावर लावण्यात यावा.

६) उमेदवार अर्हताधारक असावा, जर एखादया उमेदवाराची नेमणूक झाल्यानंतर उमेदवार अर्हताप्राप्त

नाही असे निदर्शनास आले तर सदर उमेदवाराची नेमणूक तात्काळ रद्द करण्यात येईल.

७) पत्रव्यवहाराकरिता उमेदवाराने आपला घरचा पत्ता पिन कोडसहीत अर्जात पूर्ण भरावा. तसेच संपर्क साधण्यासाठी दूरध्वनी क्रमांक, भ्रमणध्वनी क्रमांक (**Mobile No**) आणि ई मेल आयडी अर्जात नमूद करावेत.

८) उमेदवाराने अर्जासोबत शाळा सोडलेल्या दाखल्याची प्रत. जन्म प्रमाणपत्र, दहावी, बारावी व पदवी प्रमाणपत्रे यांच्या स्वत: साक्षांकित केलेल्या छायांकित प्रती अर्जासोबत जोडावीत. तसेच महिला उमेदवारांनी विवाह झाला असल्यास विवाह नोंदणी प्रमाणपत्र व नाव बदलल्याचे महाराष्ट्र शासन राजपत्र याबाबतच्या स्वत: साक्षांकित केलेल्या प्रती सोबत जोडाव्यात.

९) उमेदवारास जर कोणत्याही न्यायालयीन प्रकरण शिक्षा झालेली असल्यास सदर उमेदवाराची नेमणूक करण्यात येणार नाही. उमेदवाराने नेमणूकीच्यावेळी पोलीस ठाण्यातून चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

१०) उमेदवाराने नेमणूकीच्यावेळी वैदयकीय प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

११) निवड झालेल्या उमेदवारांची केवळ नायर रुग्णालय दंत महाविदयालयात नेमणूक करण्यात येईल.

१२) उमेदवाराची व्यवसाय चाचणी घेण्यात येईल.

१३) उमेदवार जर अन्य संस्थेत/कार्यालयात सेवेत असल्यास त्याने तेथील संस्था/कार्यालयाचे ना हरकत प्रमाणपत्र नेमणूकीपूर्वी सादर करणे आवश्यक आहे.

१४) मा. अधिष्ठाता यांना कंत्राटी तत्वावरील पदे भरण्याची निवड प्रकिया कोणत्याही टप्प्यावर बंद करण्याचा अधिकार आहे.

१५) नेमणूक केलेल्या उमेदवारास संचालक (वै.शि.व प्र.रु.) यांच्या परिपत्रक क्र.संचालक/वै.शिप्र.रु./३६४४ दि. १४.१०.२०२२ अन्वये नैमित्तीक रजा अनुज्ञेय राहतील व इतर कोणत्याही रजा अनुज्ञेय राहणार नाहीत. तसेच सदर उमेदवारांची कामाची वेळ नायर रुग्णालय दंत महाविदयालयाच्या सोयीनुसार ठरविण्यात येईल.

१६) नेमणूक केलेल्या उमेदवारास प्रत्येक ९० दिवसांपूर्वी एक दिवस सेवा खंड देण्यात येईल.

१७) नेमणूक केलेल्या उमेदवारास कंत्राटी तत्वावरील नेमणूक नियमित स्वरुपात करण्यासाठी

कोणताही दबाव किंवा न्यायालयात दावा दाखल करता येणार नाही.

१८) कंत्राटी तत्वावरील पदावरील नेमणूक झालेल्या उमेदवाराची नायर रुग्णालय दंत महाविदयालयातील सर्व कामगार/कर्मचारी/अधिकारी/ आणि रुग्ण यांचे प्रती वागणूक चांगली असणे आवश्यक आहे. तसेच दिलेल्या कामात सचोटी असणे आवश्यक आहे. तसे न आढळल्यास सदर उमेदवाराची तात्काळ सेवा बंद करण्यात येईल.

१९) निवड झालेल्या उमेदवारांना संबंधित पदावर कंत्राटी तत्वावर नियुक्त करण्यापूर्वी त्यांना रु. ५००/- किंमतीच्या स्टॅंप पेपरवर प्रतिज्ञापत्र सादर करावे लागेल.

२०) उमेदवारास सदर नोकरीचा राजीनामा दयावयाचा असल्यास किमान ०१ महिना अगोदर लेखी पत्र देणे बंधनकारक आहे तसेच आगाऊ सूचना न दिल्यास त्या महिन्याचे वेतन कपात केले जाईल.

सही/-
अधिष्ठाता
नायर रुग्णालय दंत महाविद्यालय